चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक,चंद्रपूर
१८ फेब्रूवारी,२०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7447744100 (PRO)

# :: इश्युरन्स एजंट असल्याचे भासवून गुंतवणुक रक्कम लवकरात लवकर दाम दुप्पट करुन देण्याचे आमिष दाखवून लोकांच्या कोटयावधी रक्कमेची फसवणुक करणारी आंतरराज्यीय टोळी केली जेरबंद. ::

## :: चंद्रपूर सायबर पोलीसांची कामगिरी ::

## ‘‘ज्येष्ठ नागरीक व महिला यांना सतर्क राहण्याचे केले आवाहान.’’

पोलीस ठाणे रामनगर येथील अपराध क्रमांक ११/२०२० कलम ४२०, ३४ भा.दं.वी.च्या गुन्हयाचा तपास सायबर पोलीस स्टेशन चंद्रपूर करीत असुन सदर गुन्हयाची थोडक्यात हकीकत याप्रमाणे आहे कि, सन २०१४ मध्ये यातील फिर्यादी यांच्या मोबाईल वर अनोळखी मोबाईल नंबर वरुन कपील शर्मा नामक अनोळखी ईसमाचा फोन आला व त्याने सांगितले होते की, **‘‘मी रिलायन्स इन्शुरन्सचा सिनीयर एजन्ट बोलत आहे, व आमच्या कंपणीला नफा झालेला असल्याने आमची कंपणी पैसे दाम दुप्पट वाटप करीत आहे, आपण आमच्या कंपणी मध्ये पैसे गुंतवणुक करण्यास इच्छुक आहात काय ? जर इच्छुक असल्यास आम्ही तुम्ही गुंतविलेले पैसे लवकरात-लवकर दाम दुप्पट करुन देणार आहे.’’** असे सांगितले म्हणुन फिर्यादी यांनी मोबाईलवरील अनोळखी इसमाच्या बोलण्यावर विश्वास ठेवुन पैसे गुंतवण्याचे ठरविले. फिर्यादी यांनी सन २०१४ पासुन ते दिनांक ५ जानेवारी, २०२० पावेतो अनोळखी इसमाच्या मोबाईल वरुन सांगितलेल्या विविध बॅंक खात्यात टप्या-टप्यानी एकुण ४७,१४,३००/- रुपये टाकले. त्यानंतर सुध्दा फिर्यादी यांना पैश्याची मागणी होत असल्याने त्यांना संशय येवुन त्यांची फसवणुक होत असल्याचे समजल्याने फिर्यादी यांनी पोलीस ठाणे रामनगर येथे येवुन तक्रार नोंदविल्याने अनोळखी इसमांविरुध्द दिनांक ५/१/२०२० रोजी अपराध क्रमांक ११/२०२० कलम ४२०, ३४ भा.दं.वि. चा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य व व्याप्ती पाहता मा. पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी सदर गुन्हयाचा तपास सायबर पोलीस ठाणे कडे सोपविला. मा. पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी व अपर पोलीस अधिक्षक श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक तुषार चव्हाण, पोशि प्रशांत, भास्कर, राहुल, इम्रान यांनी गुन्हयाचा तपास अत्यंत कौशल्यपूर्वक आणि तांत्रिक विश्लेषण सहाय्याने गुन्हयातील आरोपी हे दिल्ली, नोएडा, गाजीयाबाद, मेरठ, अलीगढ, बुलंदशहर उत्तर प्रदेश आणि गुडगांव हरियाणा या ठिकाणी सतत एक महिना आरोपीतांचा शोध घेवून दिनांक ४/२/२०२० रोजी आरोपी नामे (१) कुलदीप उर्फ राजकुमार वालिया उर्फ मल्होत्रा बनवारीलाल शर्मा वय २८ वर्षे, रा. उपाध्याय मोहल्ला, खैर जिला अलिगढ राज्य उत्तर प्रदेश (२) दिपसिंह उर्फे दिपु उर्फ ओबेरॉय मनवीरसिंह वय ३० वर्षे

रा. ग्राम अलीपुर गिजौरी, बुलंदशहर राज्य उत्तर प्रदेश,`(३) उसवन उर्फ अभय उर्फ रमन भोपालसिंह वय ३३ वर्षे, शास्त्री नगर, मेरठ राज्य उत्तर प्रदेशे यांना बुलंदशहर उत्तरप्रदेश येथुन शिताफीने अटक करण्यात आली. सदर अटक आरोपी प्रथम दिनांक १४/२/२०२० पावेतो त्यानंतर दिनांक १९/२/२०२० पावेतो एकुण १४ दिवस पोलीस कोठडी मिळवून तपास करण्यात येत आहे.

आजपावेतोच्या तपासात यातील आरोपीतांनी अशा प्रकारचे गुन्हे कसे करतात या बाबत माहिती घेतली असता आरोपी हे अतिशय चालाक व धुर्त असुन दिवसभरात ३०० ते ४०० लोकांना मोबाईल द्वारे फोन करुन सायंकाळ पर्यंत ६ ते ७ लोकांना अशा प्रकारची फसवणुक करीत असता त्यामध्ये विशेषत: ज्येष्ठ नागरीक व महिला यांची लक्षणिय संख्या आहे. ज्येष्ठ नागरीकांना त्यांच्या कुटूंबियांची माहिती जाणुन घेवुन परिस्थीतीनुरुप त्यांना त्यांचा मुलगा, पारिवारीक सदस्य असल्याचे पटवून देवून त्यांचे विश्वास संपादन करतात, आणि ज्या कोण्याचे इन्शुरन्स पॉलीसी काढलेले असेल व त्यांनी इन्शुरन्सचे हप्ते भरले नसेल त्यांना आरोपी हे कपील शर्मा, राजेश वालीया, ओबेरॉय, मल्होत्रा या नावाने इन्शुरन्स भरने बाकी असल्याबाबत तसेच कंपनीला नफा झाल्याचे सांगुन गुंतवणुक करण्यास लावुन लवकरात लवकर दाम दुप्पट करण्याचे आमीष दाखवुन स्वत:च्या बॅंक खात्यात पैसे भरण्यास लावुन त्यांची फसवणुक करतात. आजपावेतोच्या तपासात, आरोपीतांनी देशातील महाराष्ट्र राज्य, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, आसाम, राजस्थान अशा अनेक राज्यातील लोकांची एक कोटी एंशी लाखांपेक्षा रक्कमेची फसवणुक केल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आलेले आहेत.

तपासात, आरोपीतांकडून गुन्हयातील दहा लाखांपेक्षा जास्त किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच आरोपीतांनी गुन्हयात वापरलेले अनेक मोबाईल फोन, सिम कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, विविध बॅंकेचे पासबुक, चेक बुक, एटीएम कार्ड ईत्यादि मुद्देमाल आरोपीतांकडून हस्तगत करण्यात आलेला आहे.

## आवाहन :-

अपर पोलीस अधीक्षक तथा प्रभारी पोलीस अधीक्षक श्री प्रशांत खैरे यांनी जिल्हयातील ज्येष्ठ नागरीक व महिलांना आवाहन केलेल्या आहेत की, सद्य:स्थितीत ऑनलाईन आणि मोबाईल फोन माध्यमातून फसवणूक करण्याचं प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. वेगवेगळया पध्दतीचा वापर करुन हॅकर्स आणि सायबर गुन्हेगार आपल्या पैशांवर डोळा ठेवून असतात, त्यांच्या पासून सावध राहाणं आणि आपल्या कमाईचा पैसा सुरक्षित ठेवणं आपल्या हातात आहे. विशेषत: वेबसाईट, टेली कॉल्स, SMS ई-मेल, सोशल मिडियावरुन इंन्श्युरंन्स पॉलीसी बाबत फेक ऑफस, क्लेम सेटलमेंट, ज्यादा पेन्शन, दाम दुप्पटीचा आमीष दाखवुन किंवा इतर ऑफर्सच्या बहाण्यानं वरिष्ठ नागरीक व महिला आधी पैसे भरायला सांगत आहेत आणि त्यानंतर

त्याच्या खात्यातुन पैसे उकळून फसवणुक करण्यात येत आहे. त्यामुळे अशा प्रकारे येणाऱ्या कॉल्स, ऑफर्स पासून सावध राहणे, आणि अशा पध्दतीने संपर्क साधुन बॅकेत पैसे जमा करण्यास सांगत असेल तर सतर्क रहा. आपली कोणतीही माहिती अशा फोन कॉल्स, SMS ई-मेल वर देऊ नका. तसेच इश्युरंन्स कंपनी अथवा इतर माध्यमांद्वारे येणारे फोन कॉल्स व एजंट यांची संपुर्ण शहानिशा करुन पुढील गुंतवणुक करावी. कोणत्याही एजंट अथवा फोन कॉल द्वारे येणाऱ्या दाम दुप्पट च्या आमीषास बळी पडू नये.

## :: चुकूनही माहिती देऊ नका ::

अश्या प्रकारचे फोन उचलले किंवा वेबसाईटला भेट देवून किंवा ई-मेल द्वारे आपला अकॉऊन्ट नंबर, ओटीपी पासवर्ड, पॅन नंबर, आधार कार्ड नंबर आणि व्यक्तिगत माहिती कुणालाही शेअर करु नका त्यामुळे हॅकर्सला आपल्या अकॉऊन्टची संपूर्ण माहिती मिळू शकते. आपली एक चूक आपलं सगळं अकॉऊन्ट रिकामं करु शकते.

## :: असं घडल्यास तक्रार करा ::

अशा प्रकरच्या घटनांमध्ये संशयीतांविरोधात तात्काळ आपल्या जवळच्या पोलीस स्टेशन ला तक्रार दाखल करा. आपल्या तक्रारीची लागलीच दखल घेण्यात येवून उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदर गुन्हयाचा तपास डॉ. महेश्वर रेड्डी पोलीस अधीक्षक चंद्रपूर आणि श्री प्रशांत खैरे अपर पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार चव्हाण, पोना मुजावर अली, संतोष पानघाटे, पोशि प्रशांत लारोकर, छगन जांभुळे, इमरान शेख, राहुल पोन्दे, भास्कर चिंचवलकर, उमेश रोडे, वैभव पत्तीवार, महेश चव्हाण यांनी केला. पुढील तपास सायबर पोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार चव्हाण हे पोलीस करीत आहे.

चंद्रपूर पोलीस

**BEWARE OF FAKE OFFERS**

by websites/ tele calls/
sms/ social media

**ASKING**

**TO DEPOSIT MONEY**

in to any bank account towards Insurance,
claim settlement/ advance/ higher pension/ or
any other service provided by